Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा अभ्यास

**हर्षाली नि. बोकडे**
संशोधनकर्ता

---

**गोषवारा :**

*मानव संसाधन अंतर्गत कर्मचाऱ्यांचे वस्तुनिष्ठ व्यवस्थापन करणे सहज सोपे जाते. मानव संसाधन व्यवस्थापन अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन केले असता त्यांच्या श्रमाचा योग्य वापर करणे सोयीचे ठरते. त्यांच्या श्रमाचा विचार केला असता तितकाच त्यांच्या हिताचा सुद्धा विचार करणे महत्त्वाचे आहे. कंत्राटी कर्मचारी हे करारावर कंत्राटदाराद्वारे नियुक्त होत असून कंत्राटदार त्यांच्या हिताची जपवणूक करत नाही. कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपावरून आर्थिक व सामाजिक समस्यांना समोरा जावे लागते, त्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांच्या सोडवणूक करण्यासाठी कंत्राटी कामगारांचे विस्तृत अध्ययन करणे गरजेचे आहे. जेणेकरून त्यांच्या आर्थिक समस्या सोडवून त्यांना समाजात समानतेचा न्याय मिळवून देता येईल.*

**मुख्य शब्द :** कंत्राटी कामगार, आर्थिक, सामाजिक, समस्या.

---

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विविध कामगारांचा मोठा वाटा आहे. या कामगारांचा अभ्यास केल्यास विविध कामगारांचा समावेश दिसून येतो. उदा. कायमस्वरूपी कामगार, अंशकालीन कामगार, कंत्राटी कामगार, स्थलांतरित कामगार, इ. अशा विविध कामगारांचा समावेश आपणास दिसून येतो. कामगारांचा विश्लेषणात्मक अभ्यास केल्यास त्या कामगारांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्यांचा सामना करून रोजगार मिळवला जातो. तसेच कायमस्वरूपी कामगारांपेक्षा अंशकालीन, कंत्राटी, स्थलांतरित कामगारांना खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक व सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. सदर अभ्यासामध्ये कंत्राटी कामगारांचा विश्लेषणात्मक अभ्यास करून त्यांच्या आर्थिक समस्या व सामाजिक समस्यांचा विस्तृत अभ्यास करण्यात आला आहे.

भारतामध्ये एकंदरीत कामगारांचा अभ्यास केल्यास मोठ्या प्रमाणात कंत्राटी कामगारांचा समावेश दिसून येतो. परंतु कंत्राटी कामगारांचा वाटा लक्षात घेता त्यांना त्या प्रमाणात योग्य न्याय मिळत नाही. म्हणजेच त्यांना विविध अशा समस्यांना सामोरा जावे लागते. त्यामुळे कंत्राटी कामगार वर्ग हा आर्थिक दृष्ट्या कमकुवत आहे. कंत्राटदार कंत्राटी कामगारांकडून कमी वेतनामध्ये जास्त काम करवून मोठ्या प्रमाणात त्यांचे शोषण करतो. या शोषणाविरुद्ध लढण्यासाठी विविध कायद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. परंतु या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या अभावामुळे त्याचा लाभ कंत्राटी कामगारांना मिळत नाही. त्यामुळे कंत्राटी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे विस्तृत अध्ययन केलेले आहे.



Research Hub International Journal

**संशोधनाची उद्दिष्टे :**

कंत्राटी कामगारांच्या समस्या अभ्यासण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

1. कंत्राटी कामगारांचा अभ्यास करणे.
2. कंत्राटी कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे.
3. कंत्राटी कामगारांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये कंत्राटी कामगारांचा अभ्यास करण्यात आला असून सदर संशोधन लेखांमध्ये कंत्राटी कामगारांच्या समस्या पुरते मर्यादित अध्ययन केलेले आहे.

**तथ्य संकलन :**

सदर विषयासंबंधित तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. सदर संशोधन लेखामध्ये विविध साधनसामुग्रीचा अभ्यास करण्यात आला असून यामध्ये संकेतस्थळ, शोधनिबंध, संशोधन लेख, पुस्तके इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**कंत्राटी कामगारांच्या आर्थिक समस्या :**

**१) कंत्राटदाराकडून शोषण :**

कंत्राटी कामगारांची नियुक्ती हे कंत्राटदारामार्फत होते. कंत्राटी कामगारांच्या करारा अंतर्गत कामाची वेळ, वेतन, सुविधा या मार्फत शोषण केले जाते. या शोषणामुळे कामगारांना आर्थिक फटका बसतो.

**२) सुरक्षिततेचा अभाव :**

कंत्राटी कामगार हे विशिष्ट कालावधीसाठी नियुक्त होत असल्यामुळे त्यांच्या कामाच्या कालावधीतील सातत्य राहत नाही त्यामुळे कंत्राटी कामगारांना सुरक्षितेचा अभाव असतो.

**३) कमी वेतन :**

कायमस्वरूपी कामगारांच्या तुलनेत कंत्राटी कामगारांची वेतन हे कमी असते तसेच कंत्राटी कामगारांना त्यांच्या कामाचा मोबदला हा अत्यंत कमी असतो.

**४) कायद्यांची योग्य अंमलबजावणी होत नाही :**

कंत्राटी कामगारांचे हीत जोपासण्यासाठी कंत्राटी कामगार कायदा अस्तित्वात आणला असून त्याची योग्य प्रकारे कामाच्या ठिकाणी अंमलबजावणी होत नाही.

**५) रोजगारातील अनियमित्ता :**

कंत्राटी कामगार हे विशिष्ट कामासाठी किंवा विशिष्ट वेळेसाठी नियुक्त करत असल्यामुळे ते विशिष्ट काम

Research Hub International Journal

किंवा विशिष्ट वेळ संपुष्टात आल्यानंतर त्या कामगारांना त्यांच्या कामात सातत्य मिळत नाही व त्यामुळे कंत्राटी कामगारांच्या रोजगारात अनियमितता असते.

**६) रोजगाराविषयी शाश्वती नसते :**

कंत्राटी कामगार हे करारावर नियुक्त होत असल्यामुळे त्यांना नियमित रोजगार मिळत नाही व रोजगाराची कोणत्याही प्रकारची शाश्वती प्रदान केली जात नाही.

**कंत्राटी कामगारांच्या सामाजिक समस्या :**

**१) पगारामध्ये अनियमितता :**

कंत्राटी कामगारांचे पगार हे नियमित होत नाही त्यामुळे त्यांना मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही व इतरत्र समस्यांना सुद्धा तोंड द्यावे लागते व कंत्राटी कर्मचाऱ्यांना समाजामध्ये समानता मिळत नाही.

**२) कामाच्या ठिकाणी शोषण :**

कंत्राटी कामगार हा अंशकालीन असल्यामुळे त्यांचे कामाच्या ठिकाणी शोषण केले जाते म्हणजेच कमी वेतनामध्ये जास्तीत जास्त काम करून घेण्यासाठी त्यांची नियुक्ती केली जाते

**३) भेदभाव :**

कामाच्या ठिकाणी विविध कामगारांचा समावेश असतो उदा. कायमस्वरूपी, अंशकालीन, कंत्राटी कामगार इ. कायमस्वरूपी कामगार व कंत्राटी कामगार यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात भेदभाव दिसून येतो.

**४) प्रशिक्षणाचा अभाव :**

कंत्राटी कामगार हा अंशकालीन असून त्याची फक्त विशिष्ट कामासाठी नियुक्ती केल्यामुळे त्याला प्रशिक्षणाचा कुठलाही लाभ मिळू शकत नाही. तसेच फक्त कंत्राटी कामगारांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केल्या जात नाही कारण कंत्राटी कामगार हा विशिष्ट कामासाठी नियुक्त असतो.

**५) फसव्या कराराची निर्मिती :**

कंत्राटदाराकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियुक्ती करताना यांच्यामध्ये कराराची निर्मिती होते. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शोषण करण्यासाठी किंवा स्वतःचा स्वार्थापोटी फसव्या कराराची निर्मिती करतात.

**निष्कर्ष :**

मानव संसाधनामध्ये सर्वत्र कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. या कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी मानव संसाधन व्यवस्थापन या संकल्पनेचा वापर केला जातो. परंतु कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मानव संसाधन व्यवस्थापन ही संकल्पना फक्त काम करून घेण्याच्या बाबतीत उपयोगात आणले जाते. तसेच त्यांचे हित जोपासण्यासाठी मानव संसाधन व्यवस्थापन या संकल्पनेचा पर्याप्त वापर केल्या जात नाही तसेच कंत्राटी कामगारांना

Research Hub International Journal

संरक्षण करण्यासाठी कंत्राटी कामगार कायदा (१९७०) शासनाने अस्तित्वात आणला परंतु त्यांचे हित जोपासण्यासाठी या कायद्याची अंमलबजावणी कामाच्या ठिकाणी केली जात नाही. त्यामुळे कंत्राटी कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. त्यामुळे कंत्राटी कामगारांना आर्थिक समस्या व सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. कंत्राटी कामगारांच्या हीच जोपासण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचा अतिशय सूक्ष्मरित्या विचार करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :**


- चव्हाण, वाय. (२०२०). महाराष्ट्रातील कंत्राटी कामगार : कायदे व समस्या (IJCRT, Volume 8)
- टेंबुरणे, भु. (२०२०). स्थलांतरित कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या (IJARESM, Volume 8)
- Jati, R. (2007). Socio legal study on contract labour with special reference to Birla tyres.
- Kole, N. V. (2012). Contract Farming in India a Case Study of Maharashtra
- Kumar, P. (2017). Social security for contract workers in selective public and private sector organizations in the area of Visakhapatnam with reference to Rashtriya Ispat Nigam Limited and Coromandal International Limited.
- Meena, K. (2018). Contractual workers in copper mining industry A case study of Rajasthan and Madhya Pradesh.
- Gitte, K. N. (2016). A study of problems of sugarcane cutter labourers with special reference to maharashtra state.
- Krishna, A. (1993). Human resource management in diversified organizations a strategic management perspective.
- Tambe, S. (1996). Human resource planning in hotel industry.


Research Hub International Journal